p/mc minutes

# मुंबई विद्यापीठ

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

मसुदा

क्रमांक ५ /२०२०-२१

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२०-२१ मधील ०५.०९.२०२० च्या बैठेकिचे इतिवृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पाचवी बैठक शनिवार दिनांक ०५.०९.२०२० रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्भावलेल्या परिस्थितीमुळे ही सभा क्लाउड व्हिडियो मीटिंग (ZOOM APP) द्वारे आभासी पद्धतीने घेण्यात आली. बैठकीमधे खालील मान्यवर उपस्थित होते:-

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा सुहास पेडणेकर (कुलगुरु) | अध्यक्ष |
| २ | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र. कुलगुरु) | सदस्य |
| ३ | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४ | प्रा राजेश खरात | सदस्य |
| ५ | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ६ | प्रा माला लालवाणी | सदस्या |
| ७ | प्राचार्य महादाप्पा गोंडा | सदस्य |
| ८ | प्रा. वैभव नरवडे | सदस्य |
| ९ | श्री रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १० | ॲड. नील हेळेकर | सदस्य |
| ११ | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १२ | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १३ | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १४ | प्रा.बी. एन. जगताप | सदस्य |
| १५ | डॉ. विनोद पाटिल, प्रभारी कुलसचिव व संचालक - परीक्षा व मुल्यमापन मंडळ | सदस्य - सचिव |
| १६ | श्रीमती माधवी इंगोले (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

## स्वागत

प्रभारी कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरू करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली. मा. अध्यक्षांनी सभेची कार्यवाही सुरू करण्यास अनुमती प्रदान केली.

कुलसचिवांनी सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

माननीय कुलगुरू यांनी व्यवस्थापन परिषदेतील सर्व सदस्यांचे स्वागत करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व शिक्षक हा एकच पेशा असा आहे की एक शिक्षकच इतर क्षेत्रांतील सगळे तज्ज्ञ घडवत असतो असे गौरवास्पद सांगितले.

## श्रद्धांजली

### श्री प्रणव मुखर्जी

माजी राष्ट्रपती, ज्येष्ठ कॉंग्रेस नेते आणि भारतरत्न श्री प्रणव मुखर्जी यांचे दीर्घ आजाराने दिनांक 31 ऑगस्ट 2020 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते नव्वद वर्षांचे होते.

### डॉक्टर पी आर दुभाषी

माजी केंद्रीय सचिव गोवा विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि भारतीय विद्या भवन पुणे केंद्राचे अध्यक्ष डॉक्टर बी आर दुभाषी यांचे वृद्धापकाळाने दिनांक 31 ऑगस्ट 2020 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते नव्वद वर्षांचे होते.

### श्री सुहास लिमये

भाषा अभ्यासक श्री सुहास लिमये यांचे अल्प आजाराने दिनांक 2 सप्टेंबर 2020 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 75 वर्षांचे होते.

### प्राचार्य डॉक्टर राजपाल हांडे

मुंबई विद्यापीठाचे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे माजी संचालक आणि मीठीबाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राजपाल हांडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक 3 सप्टेंबर 2020 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 63 वर्षांचे होते.

### श्री संतोष साळुंखे

श्री संतोष साळुंखे वरिष्ठ लिपिक भौतिकशास्त्र विभाग यांचे दिनांक 13 सप्टेंबर 2020 रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

वरील सर्व मान्यवरांच्या दुखद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

विषय पत्रिकेवरिल विषयाबाबत चर्चेला सुरुवात झाली.

| बाब क्र.१ | **शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील अंतिम सत्र/ वर्षाच्या नियमित आणि पुनर्परिक्षार्थी विदयार्थ्यांची परिक्षा घेणेबाबत.** | **परिक्षा व मुल्यमापन मंडळ** |
|---|---|---|
| ठराव | १) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील अंतिम सत्र/ वर्षाच्या नियमित आणि पुनर्परिक्षार्थी विदयार्थ्यांची परिक्षा घेणेसंदर्भात परिक्षा व मुल्यमापन मंडळ व विद्वत परिषदेच्या दिनांक ५ सप्टेंबर २०२० रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र. ५.१ अन्वये पारित करण्यात आलेल्या शिफारशी मंजुर करण्यात आल्या.<br><br>२) परिक्षे संदर्भात **काही तातडीची बाब निर्माण झाल्यास त्या बाबत** निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.<br><br>३) परिक्षा घेण्यासाठी तंत्रज्ञान प्रदाता निवडण्याकरिता त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात यावी. **सदर समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.** सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.<br><br>४) कुलगुरु, **प्र-कुलगुरु व कुलसचिव यांना** तांत्रिक मदत मिळावी म्हणून **तीन** व्ही. सी. फेलो यांची ठराविक कालावधीकरिता नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. | आस्थापना १/३ |

**सर्व सदस्यांचे आभार व्यक्त करून माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रभारी कुलसचिवांनी सभा संपल्याचे जाहीर केले.**

SKSawant

(संजना सावंत)
सहा कुलसचिव

इतिवृत्त मंजूर

कुलगुरु | प्र-कुलगुरू | कुलसचिव (प्र)